Appendix X

# CERTIFICATE OF LAND

File No.LND- 1/Kavi/2486/2023 Date 7/12/2023

Certified that the land measuring **7 Hectares, 9.17 R,** is owned by the **Bharati Vidyapeeth, Pune** by way of **Allotment Letter** (In case of allotment of land, if it is not perpetual, periodicity of allotment to be mentioned from _____--___to_____--___).

It is further certified that owner of the land has given the said land to **Bharati Vidyapeeth English Medium High School, Dhankawadi, Pune** (Name of the School/Society/Trust/Company under Section 8 of companies Act, 2013) fully described in the schedule mentioned hereinafter with the following details for a period of ________--_________years from _____--______to _____--_______.

| SL | Particulars | Details |
|---|---|---|
| 1. | Plot No. (s)/ Survey No. (s)/Khasra No. (s)/Khata No.(s)/Khatauni No.(s) | 76+79A/80+81/1 |
| 2. | Name of street/village, Sub Division, District and State | Katraj, Tal- Haveli, Dist- Pune, Maharashtra. |

It is certified that the said entire land comprise of a single contiguous plot of land. It is further certified that **out of 70,917 Square meters land admeasuring 12,090 Sq. meters.** is given to **Bharati Vidyapeeth English Medium High School, Dhankawadi, Pune** (Name of the School with name of street, village, sub-division and district) run by name of **Bharatii Vidyapeeth, Pune** (Society / **Trust** / Company under Section 8 of companies Act, 2013) is located on the said plot of land.

THE SCHEDULED OF LAND ABOVE REFERRED TO

All that piece and parcel of land measuring **12,090 sq. meters** (area of land in square meters) situated in **76+79A/80+81/1** [Plot No. (s)/Survey No.(s)/ Khasra No. (s)] at **Katraj, Tal- Haveli, Dist- Pune, State- Maharashtra.**(name of street/village, sub division, district and state) and bounded as follows:

North: Survery No. 76+79A/80+81/1

West : Survery No. 76+79A/80+81/1

East : Survery No. 76+79A/80+81/1

South : Survery No. 76+81+80+76/4

TAHSILDAR HAVELI

Tahsildar Haveli (Pune)

Tahsildar Haveli (Pune)



Scanned with OKEN Scanner

अहवाल दिनांक : 31/08/2023

# महाराष्ट्र शासन

## गाव नमुना सात ( अधिकार अभिलेख पत्रक )

[ महाराष्ट्र जमीन महसूल अधिकार अभिलेख आणि नोंदवह्या ( तयार करणे व सुस्थितीत ठेवणे ) नियम, १९७१ यातील नियम ३,५,६ आणि ७ ]

गाव :- कात्रज ( 944090 ) तालुका :- हवेली जिल्हा :- पुणे

ULPIN : 21235123447 भूमापन क्रमांक व उपविभाग : 76/79अ/80/81/1

21235123447

भू-धारणा पध्दती : भोगवटादार वर्ग - 2

शेताचे स्थानिक नाव :

| क्षेत्र, एकक व आकारणी | खाते क्र. | भोगवटादाराचे नांव | क्षेत्र | आकार | पो.ख. | फे.फा. | कुळ, खंड व इतर अधिकार |
|---|---|---|---|---|---|---|---|
| क्षेत्राचे एकक हे.आर.चौ.मी<br>अ) लागवड योग्य क्षेत्र<br>जिरायत 7.09.17<br>बागायत -<br>एकुण ला.यो. क्षेत्र 7.09.17<br>ब) पोट-खराब क्षेत्र (लागवड अयोग्य)<br>वर्ग (अ) -<br>वर्ग (ब) -<br>एकुण पो.ख. 0.00.00<br>एकुण क्षेत्र (अ+ब) 7.09.17<br>आकारणी 0.00<br>जुडी किंवा विशेष आकारणी - | 5278 | सेक्रेटरी भारती विदयापिठ एरंडवणा पुणे | 7.09.17 | | | ( 9937 ) | कुळाचे नाव व खंड<br>इतर अधिकार<br>सक्षम प्राधिकार्यांच्या पूर्व परवानगी शिवाय हस्तांतरास बंदी - भुमीहीन/शेतमजुर/स्वातंत्र सैनीक यांना वाटप जमीन (1478)<br>इतर<br>कृष्णाजी रामचंद्र सप्तर्षी ( 743 )<br>इतर<br>इतर<br>राजाराम लक्ष्मण कदम ( 1827 )<br>रामभाऊ महादेव बिरामणे ( 1827 )<br>इतर<br>इतर<br>बँक बोजा - राष्ट्रीयकृत बँक<br>भारतीय स्टेट बँक व वाणीज्य शाखा ( 17970 )<br>1548 अे सदाशिव पेठ पुणे-30 ( 17970 )<br>यांचा र.रु.80000000/-चा ( 17970 )<br>बोजा ( 17970 )<br>इतर<br>प्रलंबित फ़ेरफ़ार : नाही.<br>शेवटचा फेरफार क्रमांक : 30706 व दिनांक : 20/06/2017 |
| जुने फेरफार क्र. ( 1478 )( 4787 )( 14788 )( 19601 )( 29350 )( 30706 ) | | | | | | | सीमा आणि भुमापन चिन्हे : |

## गाव नमुना बारा ( पिकांची नोंदवही )

[ महाराष्ट्र जमीन महसूल अधिकार अभिलेख आणि नोंदवह्या ( तयार करणे व सुस्थितीत ठेवणे ) नियम,१९७१ यातील नियम २९ ]

गाव :- कात्रज ( 944090 ) तालुका :- हवेली जिल्हा :- पुणे

भूमापन क्रमांक व उपविभाग : 76/79अ/80/81/1

| | | | पिकाखालील क्षेत्राचा तपशील | | | | | लागवडीसाठी उपलब्ध नसलेली जमीन | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| वर्ष | हंगाम | खाता क्रमांक | पिकाचा प्रकार | पिकाचे नाव | जल सिंचित | अजल सिंचित | जल सिंचनाचे साधन | स्वरूप | क्षेत्र | |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) |
| | | | | | हे.आर. चौ.मी | हे.आर. चौ.मी | | | हे.आर. चौ.मी | |
| 2019-20 | खरीप | | | | | | | शाळा ,इमारत | 7.0917 | |

टीप : * सदरची नोंद मोबाइल ॲप द्वारे घेणेत आलेली आहे

"या प्रमाणित प्रतीसाठी फी म्हणून १५/- रुपये मिळाले."
दिनांक :- 31/08/2023
सांकेतिक क्रमांक :- 2725000703120600008202317788

( नाव :- अर्चना मनकर वणवे )
तलाठी साझा :- कात्रजता :- हवेली जि :-पुणे

तलाठी सजा कात्रज
ता. हवेली, जि. पुणे

Scanned with OKEN Scanner

(४१)

वाचले :- १] शासन, महसूल व वन विभागाकडिल ज्ञापन क्रं. एलआरएफ/३४८३/३७१६ ३८१४-ग-६, दि. १०.९.१९८४.

२] शासन, महसूल व वन विभागाकडिल पत्र क्रमांक एलआरएफ/३४८३/३७१ ३८१४-ग-६, दिनांक ५.११.१९८४.

३] या कार्यालयाकडिल आदेश क्रं. पीआरएच/१४२१/तीन, दिनांक १७.११.

४] शासन, महसूल व वन विभागाकडिल ज्ञापन क्रं. एलआरएफ/३४८३/३७१६ सीआर-३८१४-ग-६, दि. १०.९.१९८६.

—x—

जिल्हाधिकारी कार्यालय पुणे.
महसूल शाखा
क्रं. पजह-१४२१-तीन
पुणे. १ दिनांक. ५-६-१९८७

**विषय :- जमीन - पुणे.**

स. नं. १३० ते १३३ कात्रज व स. नं. २६ व २७ धानकवडी ता. हवेली जि. पुणे भारती विद्यापीठ यांना शैक्षणिक उपयोगासाठी जमीन देणेबाबत..

## आ दे श

१. शासन, महसूल व वन विभागाकडिल पत्र क्रमांक एलआरएफ/३४८३/३७१६९/३८१४-ग.६ दि. ५.११.१९८४ अन्वये मौजे कात्रज येथील स. नं. १३० ते १३३ व मौजे धानकवडी येथील स. नं. २६ व २७ या जमिनीचे एकत्रित रेखांकनास मान्यता देवुन या रेखांकनात दर्शविलेप्रमाणे खालील क्षेत्र भारती विद्यापीठ यांना शैक्षणिक उपयोगासाठी देणेत मान्यता दिलेली होती. या मान्यतेनुसार भारती विद्यापीठ यांना करारनामा करुन घेवुन खालील क्षेत्राचा आगाऊ ताबा देणेबाबत इकडिल कार्यालयाचे क्रमांक. तसे दि. १७.११.८४ अन्वये आदेश निर्गत करणेत आले होते.

| रेखांकनात दर्शविलेली जागा. | ब्लॉकचे जागेचे क्षेत्र. चौ. मि. | उपयोग. |
|---|---|---|
| १ "जे" ब्लॉक. | ६९,२६०-०० | शैक्षणिक |
| "बी" ब्लॉक. | ९०,९५८-०० | --"-- |
| "आय" ब्लॉक. | ७०,९१७-०० | --"-- |

एकुण क्षेत्र. २,३१,१२७-००

प्रस्तुत क्षेत्राचा ताबा भारती विद्यापीठाचे कार्यवाह यांना दिनांक. १७.११.१९८४ अन्वये देणेत आलेला आहे.

२. शासन, महसूल व वन विभागाकडिल ज्ञापन क्रमांक एलआरएफ/३४८३/३७१६९/सीआर- ३८१४-ग-६ दिनांक. १०.९.१९८६ अन्वये भारती विद्यापीठ पुणे यांना प्रस्तुत जमीन देणेबाबत अंतिम मंजुरी प्राप्त झालेली आहे. यामध्ये दिलेल्या सुचनेनुसार भारती विद्यापीठ यांचेकडुन शिक्षणिक जागेचे तबलतीची किंमत रक्कम रुपये ३,४६,६९०-५० ही या रकमेवर दि. ३१.१०.१९८६ अखेर, ताबा घेतलेल्या दिनांकापासुनचे व्याज रक्कम

..३..

रुपये ५९,५७४-५० न. पै. वसूल करुन घेणेत आली आहे.

३. वरिल विवेचन विचारात घेवून मी, जिल्हाधिकारी पुणे, भारती विद्यापीठ पुणे यांना स. नं. १३० ते १३३ कात्रज व स. नं. २८ व २७ धनकवडी या जमीनीचे एकत्रातील रेखांकनात दर्शविलेली खालील क्षेत्र केवळ शैक्षणिक उपयोगासाठीच देणेकामी खालील अटी व शर्तीस अधीन राहून अंतीम आदेश देत आहे.

## जमीनीचे वर्णन

| स. नं. १३० ते १३३ कात्रज व स. नं. २८ व २७ धनकवडी या जमीनीचे रेखांकनातील भारती विद्यापीठ पुणे यांना देणु केलेली जागा. | प्रत्यक्ष जागेचे क्षेत्र चौ. मी. मध्ये. |
|---|---|
| "ओ" ब्लॉक. | ६९,२६०-०० |
| "बी" ब्लॉक. | ९०,९५०-०० |
| "आय" ब्लॉक. | ७७,९१७-०० |
| एकुण क्षेत्र :- | २,३१,१२७-०० |

अटी व शर्ती:-

१. अनुदान ग्राही, संस्थेस देणेत येत असलेली सदरहु जमीन त्या जमीनसंबंधात न्यायालयात प्रलंबीत असलेल्या दाव्याच्या अंतिम निर्णयाच्या अधीन राहील.

२. अनुदानग्राही संस्थेने असे हमीपत्र द्यावे की, न्यायालयाचा उपरोक्त निर्णय जर शासनाच्याविरुद्ध लागला तर संस्था प्रस्तावित जमीनीवरील सर्व बांधकाम स्वखर्चाने दूर करुन त्या जागेचा ताबा विनातक्रार शासनास देईल.

३. सदरच्या जमीनी किंवा तिचा कोणताही भाग/हिस्सा किंवा तिच्यातील कोणत्याही प्रकारचा हितसंबंध शासनाचे पूर्व परवानगीशिवाय तबदील करता येणार नाही.

४. सदरच्या जमीनी ज्या कारणासाठी देणेत आलेल्या आहेत त्याच कारणासाठी सदरच्या जमीनीचा ताबा दिलेल्या तारखेपासून दोन वर्षांच्या आत वापरल्या पाहिजेत.

५. सदरच्या जमीनीमध्ये बांधावयाच्या इमारतीचे बांधकाम नकाशे संबंधीत नियोजन प्राधिकाऱ्याकडून व जिल्हाधिकारी यांचेकडून प्रथम मंजूर करुन घेणे आवश्यक आहे. तसेच सदर इमारतीत करावयाच्या बदलात जिल्हाधिकारी यांची पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे.

५ (अ) शासनाचे शिक्षण विभागाचे मान्यतेनुसारच सदरच्या आदेशान्वये देण्यात आलेली जमीन पुढे प्रति ग्राहत्याच्या ताब्यात, या आदेशात नमूद केलेल्या सर्व अटीस अधीन राहून, देण्यात येईल.

६. सदर जमीन अथवा त्यातील कोणतीही इमारत शासनाच्या स्पष्ट संमतीशिवाय तात्पुरत्या स्वरुपात अथवा कायमच्या स्वरुपात ज्या कारणासाठी देण्यात आली त्या व्यतिरिक्त इतर कोणत्याही कारणासाठी वापरता येणार नाही

..३..

Scanned with OKEN Scanner

तसेच सदर जमिनीचा अथवा त्यातील इमारतीचा अशा कोणत्याही कारणास्तव उपयोग करता येणार नाही की, ज्यामुळे प्रतिग्राहत्याला [भारती विद्यापीठ पुणे यांना] फायदा होईल.

७. प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा व महाविद्यालये व त्याचा सर्व पूरक कार्यक्रम सर्व जाती, जमाती, धर्म इत्यादीत मुले खुला राहील.

८. सदर जमिनीचा ताबा घेतल्यापासून दोन वर्षाचे आंत दर १००-०० चौ. मि. ला दहा याप्रमाणे यथायोग्य ठिकाणी या जमिनीत झाडे लावली पाहिजेत व त्याची देखभाल कायम स्वरूपाने करण्यात आली पाहिजे.

९. ज्या वेळेस सदर जमीन अथवा त्यामध्ये बांधलेली कोणतीही इमारत अनधिकृतरित्या इतर कोणत्याही कारणासाठी, की ज्या योगे प्रतिग्राहत्याला फायदा होतो अशा कारणासाठी, वापरली जाईल त्यावेळेपासून इतर शास्तीस अधीन राहून सदर जमिनीत महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ४५ अन्वये शेतीची जमीन अनधिकृत बिगर शेती उपयोगाकरिता वापरण्यात आली असे गृहीत धरून ताबा दिलेल्या तारखेपासून बि. शे. सारा आकारणीस पात्र राहील तसेच कलम ४५ अन्वये होणाऱ्या दंडास व खालील शास्तीस पात्र राहील.

[अ] एकूण झालेल्या उत्पन्नाच्या [फायद्याच्या] ५० % जर ती जमीन/ बांधकाम अनधिकृतरित्या राहण्याचे कारणास्तव वापरली तर व ७५ % जर ती इतर कोणत्याही अनधिकृत कारणास्तव वापरली तर, शासनास भरण्यास पात्र राहील. अथवा याबाबत शासन वेळोवेळी करेल त्या नियमान्वये होणाऱ्या दंडास पात्र राहील.

[ब] सदरचे जमिनीची एकूण किंमत रुपये १३,८८,७८२/- इतकी होत आहे. त्या किंमतीमध्ये भारती विद्यापीठास ७५ % सवलत दिलेली आहे. ही सवलत दिलेली रक्कम भरावी लागेल.

१०. सदर जमिनीत असणाऱ्या खनिजाबाबतचे अधिकार शासनाकडे अबाधित रहातील तसेच सदर खनिजाचा शोध घेण्यासाठी व ते काढण्यासाठी जमिनीत प्रवेश करण्याचा त्या ठिकाणी खनन करण्याचा शासनाचा हक्क अबाधित राहील.

११. ज्या वेळेस शासनास सदरची जमीन कोणत्याही सार्वजनिक उपयोगाकरिता हवी असेल तेव्हा अथवा याबाबत कोणत्याही प्रकारचा शर्तीभंग झाला असेल तेव्हा प्रतिग्राहता सदर जमीन स्वतः त्यातील सर्व इमारती दूर करून व त्यातील सर्व हितसंबंध नष्ट करून शासनास परत करेल. मात्र सार्वजनिक प्रयोजनार्थ जमीन देते वेळेस बांधलेल्या इमारती संबंधीची नुकसान भरपाईची रक्कम शासन ठरवेल ती अंतीम राहील.

१२. प्रतिग्राहता भारती विद्यापीठ ही संस्था भोगवटादार वर्ग-दोन" म्हणुन जमीन धारण करील.

१३. भारती विद्यापीठ ही संस्था उक्त जमिनीचा विकास व आवश्यक असलेल्या सुधारणेंची तरतूद स्वखर्चाने करून घेईल.

१४. वर नमूद केलेल्या कोणत्याही एका शर्तीचे आणि महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ याचे उपबंध आणि त्यान्वये करण्यात आलेले नियम यांचा भंग होऊन आणि त्या प्रकारची शर्तीभंगाची नोटीस देऊन जिल्हाधिकारी

Bharati Vidyapeeth
Dhankawadi
Pune-43.
English Medium High School

ज्या इतर शर्ती बाबतीत अशा शर्तीपैकी कोणत्याही शर्तीचे उल्लंघन केल्यास, जमीनीचे प्रदान रद्द करण्यात येईल आणि कोणतीही भरपाई न देता शासन ती जमीन संस्थेकडून काढून आपलेकडे परत घेईल.

१५. भारती विद्यापीठ संस्था, महाराष्ट्र जमीन महसूल [सरकारी जमीनी विल्हेवाट लावणे] नियम १९७१ यातील [illegible] नियमान्वये विहित केलेल्या संबंधित नमुन्यात वरिल अटी व शर्ती समाविष्ट करण्यास व त्यांना मान्यता [illegible] देणारा करारनामा करुन देईल.

सही/- वि. पां. राणे
जिल्हाधिकारी पुणे.

प्रति-

मा. कार्यवाह,
भारती विद्यापीठ पुणे
लालबहादूर शास्त्री मार्ग पुणे. ३०

प्रत:- मा. तहसिलदार हवेली यांचेकडे माहितीसाठी व जरुर त्या कार्यवाहीसाठी रवाना.
२] मा. उपविभागीय अधिकारी हवेली
३] मा. जिल्हा निरिक्षक भुमि अभिलेख पुणे. १
४] मा. सहाय्यक संचालक, व नगररचना २८३, नारायण पेठ पुणे. ३० यांचेकडे अग्रेषित.
प्रत:- मा. आयुक्त पुणे विभाग पुणे यांचेकडे सविनय सादर
प्रत:- मा. सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय मुंबई- ३२ यांचेकडे माहिती-साठी सविनय सादर.

जिल्हाधिकारी पुणे, करिता.

एन/-

सत्यप्रत

सहकार्यवाह
भारती विद्यापीठ, पुणे-३०.